# पर्यावरण आणि नागरी प्रश्न

लोक नेहमीच शहरांकडे ओढले जातात. त्यामुळे एके काळच्या लहान वस्त्यांचं रुपांतर अनेक शतकांच्या वाटचालीत मोठ्या जनसमुदायांच्या वसाहतीत झाले. या वसाहतीही कालांतराने जोडल्या जाऊन महानगरं उदयाला आली. बहुतेक देशांच्या इतिहासात महानगरं ही "विकासाला गती देणारी यंत्रणा" ठरली. तिथल्या लोकांची म्हणजे "नागरिकांची" राहणी उच्च दर्जाची असे आणि आजही तशीच आहे. हा दर्जा तुम्ही किती गोष्टींचा उपभोग घेता अथवा वापरता यावर ठरतो. त्यामुळे शहराच्या सतत वाढणाऱ्या लोकसंख्येत अनेक वस्तूंचा वापर, आहे त्याच पातळीवर किंवा वाढीचा राहण्यासाठी, वस्तूंची निर्मितीही वाढायला लागते. औद्योगीकरणाला वेग येतो आणि निसर्गातल्या कच्च्या मालाचा वापर होऊन मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. साहजिकच शहरांची वाढ खाली म्हटलेल्या दुष्परिणामांना कारणीभूत होत असते.

- पर्यावरणाची कमालीची हानी आणि नैसर्गिक व्यवस्थेवर प्रचंड ताण. जो केवळ शहराच्या सीमेशी मर्यादित नसून आसपासच्या आणि लांबच्या मुलुखालाही किंमत मोजायला लावतो.
- निसर्गातल्या कच्च्या मालाचा, साधन संपत्तीचा आणि उर्जास्रोतांचा अतोनात वापर आणि मोठ्या प्रमाणात नासधूस तसेच कचऱ्याची निर्मिती
- सरते शेवटी नागरिकांच्या स्वास्थ्यावर त्याचा दुष्परिणाम आणि राहणीमानावरही अनिष्ट परिणाम
- विषमता – शहरातल्या काहीच लोकांना उच्च राहणीमान मिळते

हे विचारात घेता प्रश्न उद्भवतो की सर्वांपर्यंत पोचणारा सर्वांगीण विकास शक्य आहे का? म्हणजेच–

१. सर्वांच्या राहणीमानात सुधारणा – अर्थात "चांगलं अथवा समृद्ध राहणीमान" याची नव्याने व्याख्या करावी लागेल!
२. विषमता दूर करून मूलभूत सुविधा सर्वांपर्यंत पोचवणे आणि एक मानानं जगता येईल असं उपजीविकेचं साधन उपलब्ध करून देणे.
३. पर्यावरणावरची हानी कमी करणे किंबहुना त्याची जोपासना करणे.

**शाश्वत विकास** (sustainable development) ही बहुचर्चित संकल्पना यावर मार्ग!

शाश्वत विकास म्हणजे काय हे थोडक्यात सांगणं कठीण आहे पण त्याची मूलभूत तत्व अशी आहेत–

१. कमितकमी साधनांचा जास्तीतजास्त उपयोग – वरवर सोपं वाटणारं विधान पण त्याचे परिणाम दूरगामी आहेत. म्हणजेच पर्यायाने खरोखर अनावश्यक गोष्टींमध्ये काटछाट, वस्तूचा वापर होताहोईतो लांबवणे आणि टाकाऊतून अथवा कचऱ्यापासून दुसरी उपयोगी निर्मिती
२. लोकोपयोगी उपाययोजनांचा आग्रह धरायला हवा. तंत्रज्ञानावर आधारित उपाय सोपे वाटतात पण त्यायोगे हजारोंचे उपजीविकेचे साधन नाहिसे होणार असेल तर ते स्वीकारू नये. उदा.: कचऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी "प्लाज्मा इन्सिनरेशन" अथवा RDF असे खर्चिक उपाय सुचवले जात आहेत. त्या ऐवजी आज पुण्यात हजारो, प्रामुख्याने स्त्रिया कचरा गोळा करतात. त्यांना कचऱ्याच्या नियोजनात सामावून घेऊन हे असंघटित क्षेत्र अधिक बळकट आणि कार्यक्षम करण्याची गरज आहे.
३. सर्व नैसर्गिक साधन संपत्तीची **किंमत** ठरवली पाहिजे. म्हणजे हवा, पाणी, हिरवाईची संपत्ती म्हणून आपल्या अर्थव्यवस्थेत किंमत लावली पाहिजे. उदा. आपली प्राचीन जंगलं एक अमूल्य ठेवा असूनही त्यांची आपल्या GDP त (राष्ट्रीय बृहन उत्पादकता) गणना नाही. झाडं तोडून त्याचं फर्निचर झालं तर "उत्पादन" होतं! त्यायोगे GDP त (राष्ट्रीय बृहन उत्पादकता) वाढ होते! आता लक्षात येईल की आपल्या धोरणांत जंगलतोड करण्याला का प्राधान्य देतात आणि त्यांच्या जोपासनेकडे का लक्ष देत नाहीत.

या पार्श्वभूमीवर आपण काही उपाययोजना तातडीनं करण्याची जरूरी आहे.

१. आपण शहराच्या वाढीचा आराखडा करायला पाहिजे. यासाठी रीजनल प्लॅन आणि महानगर विकास आराखडा करण्यात येतात. पण हे आराखडे करतांना उपलब्ध असलेली नैसर्गिक साधन संपत्ती विचारात घेणं आवश्यक आहे. म्हणजे आपोआपच शहराच्या लोकसंख्येची घनता निश्चित करता येईल.

२. नैसर्गिक साधन संपत्तीचा कार्यक्षम उपयोग करून घेण्यासाठी आर्थिक/वैचारिक गुंतवणूक: शहराला जेवढी नैसर्गिक साधन संपत्ती उपलब्ध असेल तेवढाच त्याचा विस्तार ठेवणे. उदा.: उपलब्ध असलेल्या पाण्यावर शहराची वाढ बेतणे. अर्थात सांडपाण्याच्या पुनर्वापरामुळे आणि पावसाचे इ. पाणी आडवण्याचे उपाय केल्यामुळे (water harvesting ) काही प्रमाणात विकासाच्या कक्षा रुंदावतील. शिवाय सर्व विकास आराखड्यांनी कचऱ्यापासून मिळकतीला, त्याच्या विभाजनातून पुनर्वापराला आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य द्यायला हवे आणि नुसते कचरा डेपो उभारू नयेत.

३. प्रत्येक शहराच्या वाढीला त्याला उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीची आणि तिच्या सुयोग्य वापरावर आधारित मर्यादा असते. आज सगळीकडे दिसतं तशी शहराची बेसुमार वाढ कृत्रिमरीत्या घडवून आणायची ही विघातक प्रणाली हाणून पाडली पाहिजे. मुंबई पुण्याजवळ वारेमाप सवलती देऊन औद्योगिक वसाहती (SEZs) निर्माण करण्याऐवजी लहान शहराजवळ त्या वसवणं जास्त संयुक्तिक नाही का?

४. नागरिकांना पाण्याच्या वापरासाठी आणि कचरा करण्याच्या प्रमाणात कराची आकारणी: आपण पाण्यासाठी आणि कचऱ्यासाठी ठराविक आकार भरतो. नागरिकांना जसा विजेच्या वापरावर आधारित आकार भरावा लागतो म्हणून त्याचा काटकसरीनं वापर होतो. तसाच पाण्याच्या वापरावर आणि कचरा करण्यावर एक न्याय्य आकार बसवावा. यामुळे दुर्बल घटकांना वाजवी दरानं मूलभूत सुविधा मिळतील, परंतु जे मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर (किंवा कचरा) करतील त्यांना दंडात्मक आकार भरावा लागेल. उदा. पिण्याच्या पाण्याला क्षुल्लक शुल्क पडेल, पण तुम्हाला पोहण्याचा तलाव हवा असेल तर जबर किंमत द्यावी लागेल (खाजगी पोहण्याचे तलाव करू द्यावे की नाही हा पण विचार करण्यासारखा मुद्दा आहे).

५. प्रत्येक योजना आखतांना तिचा पर्यावरण आघात अहवाल व्हायला पाहिजे, ज्यात हवा, पाणी आणि हिरवाईच्या गुणवत्तेवर होणाऱ्या परिणामाची योग्य ती मोजदाद दिसेल. त्याशिवाय तिचा रहदारीवर आणि लोकांच्या रोजगारावर पडणारा प्रभाव लक्षात येईल. पर्यायी योजनांचीही मांडणी व्हायला हवी.

६. प्रत्येक शहर एका विशिष्ट नागरी सजीव सृष्टीत विसावलेले असते – पाण्याचे साठे, वनं, जुने वृक्ष, टेकड्या, गुहा इ. जागा जैविक वैविध्यानं नटलेल्या असतात. माणसांनी कदापी हस्तक्षेप करू नये अशा. शहर चारी बाजूंनं विकासाच्या दडपणाखाली असतं पण या जागा पुढच्या पिढीसाठी, निसर्गाच्या ऋणासाठी जपल्या पाहिजेत. यावर अतिक्रमण म्हणजे स्वार्थाची परिसीमा होय.

७. शाश्वत वाहतुकीची योजना – वाहतुकीमुळे फार मोठ्या प्रमाणात खनिज इंधनाचा उपयोग केला जातो. त्यामुळे प्रदूषण आणि हिरवाईचा नाशही मोठ्या प्रमाणात होतो. शहरांनी खाली सुचवल्याप्रमाणे ३ कलमी योजना आखावी_

- अ) सार्वजनिक वाहतुक अद्यावत् करणं आणि त्यात भरपूर गुंतवणूक करणं. सार्वजनिक वाहतुक म्हणजे बससेवा इ. आरामदायी, सुविधाजनक, विश्वासार्ह आणि खिशाला परवडेल अशी
- आ) पादचाऱ्यांना चालता येईल अशी शहर रचना जिथे सायकल चालवणंही सुकर आणि सुरक्षित असेल
- इ) वाहतुक व्यवस्थापनांतर्गत शहरातल्या खाजगी स्वयंचलित वाहनांच्या वापरावर नियंत्रण आणण्याची धोरणं स्वीकारणं

ही ३–कलमं स्वीकारणारी शहरं स्वच्छ आणि राहण्यास सुखाची असतील. ती आपल्या नागरिकांना वाहतुकीसाठी आकर्षक पर्यायी व्यवस्था देतील. त्याउलट मोटर गाडीला प्राधान्य देणारी शहरं रहायला निकृष्ट, प्रदूषित होत जातात.

८. विकेन्द्रीकरण – भारतीय शहरांच्या विकासातला एक मोठा अडथळा म्हणजे शहराच्या व्यवस्थापनाला पुरेशी क्षमता किंवा सत्ता नसते. विकासाचे आराखडे, उच्च पदस्थांच्या नेमणुका, म्हणजे उदा. महानगराच्या आयुक्तांची नेमणूक राज्य सरकारच्या हातात असतात. जगातील महानगरांचे, उदा. न्यू यॉर्क आणि लंडनचे महापौर नागरिकांनी निवडून दिलेले असतात. परिणामतः त्यांच्या हातात शहर घडविण्याचे जास्त अधिकार असतात. त्यामुळे शहर व्यवस्थापन जास्त सक्षम असते. अशा शहरात योजना आखतांना लोकांचा सहभाग गृहित धरला जातो. आपल्याकडे ग्राम सभेच्या धर्तीवर Area Sabha चा कायदा लागू केल्यास इथेही नागरिकांचा सहभाग वाढून ते आपल्या परिसरात तसेच स्थानिक शासनात सुधारणा घडवून आणतील. यासाठी संसदेसमोर चर्चेसाठी असलेल्या या कायद्याला मान्यता मिळावी.